UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
# या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

**पुरवणी अंक २ – जून २०२४ (त्रैमासिक)**

- **शके १९४६**
- **वर्ष : ९२**
- **पुरवणी अंक : २**

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

**✷ प्रकाशक ✷**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०

Email ID : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

लेख सदस्यता वर्गणी : रु. २५००/–

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, पुणे.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


१. **Eco-Friendly Farming**

- i) Dr. Santosh Raghunath Koli, ii) Mr. Kiran C. Kanade ------------------ ७

२. **A Study of the Nexus Between E-Governance and Sustainable Development**

- i) Mrs. Priyanka Vinayak Salokhe, ii) Dr. Deepa R. Ingavale ------------- १०

३. **Politics of Environmentalism**

- Rushikesh Kiran Inamdar ------------------------------------------------ १६

४. **आधुनिक काळातील शेतकरी व शेतमजूरांच्या समस्या**

- महेंद्र नारायणजी कुंभारे ----------------------------------------------------- २३

५. **पर्यावरण संवर्धनातील ग्राम पंचायतींची भूमिका: समाजशास्त्रीय अभ्यास**

- प्रा. पी. डी. पाटील ------------------------------------------------------- २८

६. **ग्रामीण तसेच कृषी विकासात संत आणि शासनाची भूमिका: एक समाजशास्त्रीय अध्ययन**

- प्रा. अमोल वासुदेवराव ठाकरे ----------------------------------------------- ३३

७. **निसर्ग आणि पर्यटन विकास**

- प्रा. डॉ. सुनिल व्यंकटेश सामग --------------------------------------------- ३७

८. **पर्यावरण आणि एनजीओ**

- डॉ. मंजूषा शरदकुमार माळवतकर --------------------------------------------- ४०

९. **पर्यावरण आणि खेळ**

- प्रा. मनिषा शंकर शिंदे ------------------------------------------------------ ४५

१०. **पर्यावरण आणि प्रदूषण**

- १) प्रा. बी. जे. कुकडे, २) सौ. संगिता यशवंत पाटील -------------------------- ४८

११. **पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनातील भारतीय स्त्रियांच्या भूमिकेचा अभ्यास**

- अरविंद अनिल घोडके ------------------------------------------------------- ५०

ISSN No. 2394-5990


१२. **पर्यावरण प्रदूषण: समाज आणि शासकीय नीति–धोरण**

- डॉ. राजू बुरीले ---------------------------------------------------------------- ५४

१३. **वायू प्रदूषणाचे पर्यावरण आणि मानवी आरोग्यावर होणारे परिणाम**

- डॉ. राजेंद्र बगाटे ---------------------------------------------------------------- ५९

१४. **भारताचे पर्यावरण धोरण आणि वास्तव**

- श्री. अखिलेश विश्वासराव शिंदे ---------------------------------------------- ६५

१५. **आदिवासी आणि निसर्ग**

- कौशल्या चांगुजी खिल्लारे ---------------------------------------------------- ६९

१६. **आधुनिक काळातील पर्यावरण बदलाचा जीवसृष्टीवरील प्रभाव : एक अभ्यास**

- डॉ.सुप्रिया आनंदराव देसाई ------------------------------------------------ ७१

१७. **भारतातील पर्यावरण चळवळ : एक अध्ययन**

- प्रा. डॉ. सुषमा अर्जुन जाधव ---------------------------------------------- ७४

१८. **मानव आणि आरोग्यविषयक समस्या : एक समाजशास्त्रीय अध्ययन**

- डॉ.साईनाथ रामजी घोगरे -------------------------------------------------- ७८

१९. **पर्यावरण संवर्धनात राष्ट्रीय सेवा योजनेची (NSS)** भूमिका: एक समाजशास्त्रीय विश्लेषण

- १) डॉ. रामेश्वर मोरे, २) प्रा. अभय जायभाये -------------------------------- ८०

२०. **Solapur City : The Growth of Population (1901 to 2011)**

- Dr. Rjakumar Moharkar ---------------------------------------------- ८३

२१. **A Study of Factors Shaping Tourists Visit to Jim Corbett National Park**

- i) Dr. Jyoti, ii) Suresh Singh, iii) Rakesh -------------------------------- ८८

२२. **A Study of Computer Anxiety among Teacher Trainees considering Gender and Geographic Disparities**

- Dr. Vinayak Sopan More ---------------------------------------------- ९३

२३. **Locating The Innovation And Application of Artificial Intelligence Sports And Training**

- i) Ms. Radhika A H, ii) Dr. T. Shanmugavalli ---------------------------- ९८

२४. **Impact of ICT on Information Seeking Behaviour of Users in Pharmacy Colleges in Vidarbha Region**

- i) Mr. Sachin P. Dhande, ii) Dr. Shashikant G. Rokade ------------------ १०४

२५. **Professional Standards for Teachers and Teacher Educators: Understanding the Mandate of NEP-2020 for Quality Education**

- i) Dr. Priyanka Varshney, ii) Dr. Aruna Kumari ------------------------ १११

२६. **Domestic Violence Against Women and Children is a Social Evil: A Study with Special Reference to Domestic Violence Act, 2005**

- Mr. Baban T. Bhalerao ------------------------------------------------ ११७

२७. **Development in Science and Technology Vis a Vis Protection of Biodiversity: A Study**

- Rohini S. Dhikale --------------------------------------------------- १२२

२८. **A Clarion Call to Climate Crisis: Navigating Amitav Ghosh's *Gun Island***

- i) Kanishka Singh, ii) Lata Dubey -------------------------------------- १२६

२९. **Legal Approaches to Marital Rape : An Indepth Comparison of India And The Us**

- i) Satyendra Kumar Pandey, ii) Dr. Himani Bisht ------------------------ १३२

३०. **A study of Achievement Motivation among male and female Adolescence**

- Priyanka Sajanraj ----------------------------------------------------- १३६

३१. **Chandigarh City's Air Quality; Current Status And Trends**

- Himanshu ------------------------------------------------------------- १४१

३२. **Educators Basic Information And Communication Technologies (ICT) Competence Belief For Its Integration in Educational Setting - An Analysis of Influencing Factors**

- i) Dr. Sourav Choudhury, ii) Joy Prakash Deb ------------------------ १४८

३३. **Educational Problems of Orphan Children**

- i) Dr. Jadab Dutta, ii) Dr. Pranab Chetia -------------------------------- १५५

३४. **Exploring Eco-magical Realism in Avinuo Kire's *Where the Cobbled Path Leads***

- Dr. Pranav Khoche --------------------------------------------------- १६०

३५. **Impact of Internet Banking on Traditional Banking Services**

- Prof. Amrita Ramesh Billade --------------------------------------------- १६४

३७. **Impact of Koha Integrated Library System on College, University, Institute and Organization Libraries in Maharashtra: An Empirical Investigation**

- Dr. R.M. Marwade --------------------------------------------------- १६८

३८. **An Ethno-Archaeological Study of Rock Art of Bhimamandali**

- Dr. Atula Kumar Pradhan --------------------------------------------- १८४

३९. **From Stem To Steam : An Exploration of Art Integration in Stem Education in Stem Education to Enhance 21st Century Skills Among Science Learners**

- i) Shishir Mohanty, ii) Aishwarya Mishra, iii) Dr. Pratima Pradhan ------ १८९

४०. **Academic Procrastination among Post Graduation Students in relation to their Internet Usage**

- i) Ashis Dash, ii) Dr. Ranjan Kumar Rout -------------------------------- १९६

४१. **Over view of National education policy, 2020 in the context of inclusive education**

- i) Dr. Shruti Kirti Rastogi, ii) Prof. Harishankar Singh ------------------- २०१

४२. **A Study of Status of Teacher Accountability Among Student Teachers**

- Dr. Bhagwat Asaram Shinde ------------------------------------------ २०६

४३. **Cleaning The Kitchen Sink: A Study of The Portrayal of The Bald, Bold, Pudgy, and Ugly in Recent Indian Cinema**

- i) Dr. M. Shanthi, ii) Mr. Subhash Kamalkar ----------------------------- २११

४४. **Eco-Critical Concern in English Poetry : A Study**

- Dr. Ambadas Dadasaheb Sakat ---------------------------------------- २१६

४५. **Women Empowerment through Blockchain Technology: A SWOC Analysis Perspective**

- i) Mrs. Vidya Bhosale, ii) Dr. Pallavi Jamsandekar ---------------------- २२०

४६. **बसव साहित्यातील नैतिक वचने**

- प्रा.डॉ.दत्ता पिलाप्पा हिंगमिरे ------------------------------------------------ २२५

४७. **विनाअनुदानित शाळांशी संबंधित संशोधनांचा आढावा : एक पुनरावलोकन**

- १) दिवाकर ऋषी दुर्गे, २) डॉ.रजनी वासुदेव वाढई ---------------------------- २२८

४८. **पंढरपूरच्या ऐतिहासिक मंदिर स्थापत्यशैलीचा विकास आणि वैशिष्ट्ये**

- १) प्रा. वैशाली प्रसाद लाटकर, २) प्रा. अभिजीत सदाशिव नातू ---------------- २३३

४९. **संत तुकाराम आणि संत विठाबाई यांचे अभंग: एक तौलनिक अभ्यास**

- सहा. प्राध्यापक सौ प्रज्ञा वि. राजेबहादूर ------------------------------------- २४१

५०. **डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे महिला उद्धाराविषयी विचार**

- प्रा.डॉ.कर्पे बाळासो निवृत्ती ------------------------------------------------ २४७

५१. **आनंदी देशासाठी समताधारीत शैक्षणिक प्रणालीची आवश्यकता : फिनलंड आणि भारत एक तुलनात्मक विश्लेषण**

- १) अक्षदा मोरमारे, २) डॉ. देवानंद शिंदे ------------------------------------ २५०

५२. **ममता कालिया की कहानियों में स्त्री स्वातंत्रता बोध**

- डॉ. संतोष गिरहे ------------------------------------------------------------ २५५

▲▲▲

# आनंदी देशासाठी समताधारीत शैक्षणिक प्रणालीची आवश्यकता : फिनलंड आणि भारत एक तुलनात्मक विश्लेषण

**१) अक्षदा मोरमारे**
संशोधन अभ्यासक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
केंद्र कर्वे समाज सेवा संस्था पुणे.

**२) डॉ. देवानंद शिंदे**
संशोधन मार्गदर्शक, प्राध्यापक,
कर्वे समाज सेवा संस्था पुणे.

**सारांश:**

शिक्षण हे मानवाच्या जडणघडणीत महत्वाचे योगदान देते. मुलांच्या सामाजिकरणाच्या प्रक्रियेत कुटुंबाप्रमाणे शिक्षण हा देखील महत्वाचा घटक आहे. अगदी आतापर्यंत शिक्षण फक्त अर्थाजनासाठी घ्यायचे असते, अशी समाजात धारणा होती. चांगले उत्पन्न असणाऱ्या व्यक्ती अधिक आनंदी व सुखी असे अनेकांना वाटते. खरं तर जीवनाची गुणवत्ता सुधारण्यास मदत करते ते खरे शिक्षण. रवींद्रनाथ टागोर म्हणतात, शिकविणे हे जर रसात्मक नसेल तर आनंद निर्माण होणार नाही आणि आनंद निर्माण झाला नाही तर विद्यार्थ्यांची बुद्धी विकसित होणार नाही, मन संस्कारित होणार नाही आणि चैतन्य निर्माण होणार नाही. आपण फिनलंड देशाचा विचार केला तर, २० मार्च २०२४ रोजी प्रकाशित झालेल्या ङ्गजागतिक आनंद निर्देशांक अहवालामध्ये हा देश प्रथम क्रमांकावर आहे. भारत हा १४६ देशांमध्ये १२६ व्या क्रमांकावर आहे. फिनलंड हा देश २०१८ ते २०२४ अशी सलग सात वर्षे प्रथम क्रमांकावर आहे. या देशाने सातत्य टिकवून ठेवले आहे. या देशात समताधारीत शिक्षण व्यवस्था आणि कल्याणकारी राज्य ही संकल्पना अस्तित्वात आहे. या लेखामध्ये भारत आणि फिनलंड या देशांमधील आनंद आणि शिक्षण यांचा सहसबंध या घटकांची साहित्य पुनरावलोकनाद्वारे माहिती संकलित करून तुलनात्मक मांडणी केली आहे.

**शब्दसूची:** शैक्षणिक धोरण, जागतिक आनंद निर्देशांक, समानता, सामाजिक मुल्ये, शिक्षण व्यवस्था, आनंद.

**प्रस्तावना :**

प्रत्येक व्यक्तीला आनंदी व समाधानी आयुष्य हवे असते. त्यासाठी प्रत्येकजण धडपड करत असतो. चांगले शिक्षण मिळाले तर पुढे आयुष्य आनंदी होईल असा एकंदरीत समाजात समज आहे. आपण वास्तव्य करतो, तेथील परिस्थितीचा व्यक्तीच्या जीवनावर परिणाम होत असतो. शासनामार्फत मिळणाऱ्या सेवा सुविधा व सुरक्षितता, त्यांची आवड तसेच व्यक्तिगत स्वातंत्र्य यावर व्यक्तीचे समाधान आणि आनंद अवलंबून असतो. साने गुरुजी म्हणतात, 'सामाजिक न्याय, सामाजिक समता आणि सामाजिक बंधुभाव वाढायचा असेल तर शिक्षणातून राष्ट्रीय एकात्मतेचा धडा शिकविला पाहिजे.'

भारताचे माजी राष्ट्रपती व शिक्षणतज्ञ डॉ. झाकिर हुसेन म्हणतात, 'विद्यार्थ्यामध्ये सत्यप्रीती वाढविणे, प्रामाणिकपणाची जोपासना करणे, सहकार्य भावना निर्माण करणे, समाजसेवेची भावना वाढविणे, तुच्छ स्वार्थांना तिरस्करणीय समजण्याची भावना निर्माण करणे व निसर्गातील सौंदर्याचा शोध घेणाऱ्या दृष्टीचा विकास करणे हे शिक्षणाचे ध्येय होय'. शिक्षण ही मनुष्य घडवण्याची प्रक्रिया आहे. आनंद हा देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनापेक्षा अधिक महत्वाचा ठरला आहे असे जागतिक आनंद निर्देशांक अहवालातून दिसून येते. जागतिक आनंद निर्देशांक हा अहवाल संयुक्त राष्ट्र शाश्वत विकास समाधान नेटवर्क याकडून प्रकाशित केला जातो. या अहवालात एकूण देशांतर्गत उत्पादन, आयुर्मान, उदारता, सामाजिक समर्थन, स्वातंत्र्य आणि भ्रष्टाचार या सहा घटकांवर आधारित आनंदाचे मोजमाप केले जाते.

**भारताच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा :**

भारतात प्राचीन काळापासून गुरुकुल शिक्षण पद्धती अस्तित्वात होती. अध्यात्मिक वाढ, आत्मसंयम, सामाजिक जाणीव, व्यक्तिमत्व विकास, बौद्धिक विकास, चारित्र्य निर्मिती, ज्ञान आणि संस्कृतीचे जतन, योग, आयुर्वेद, विज्ञान इत्यादींचा शिष्याने विचार करणे आणि अंगीकारणे हा गुरुकुल पद्धतीचा मुख्य उददेश होता. भारतात शिक्षण व्यवस्थेची बीजे अगदी प्राचीन काळापासून रोवली गेली आहेत. नालंदा, तक्षशीला, वल्लभी, विक्रमशीला, शारदा इत्यादी विद्यापीठे प्राचीन भारतात अस्तित्वात होती. बदलत्या काळानुसार तसेच परकीय आक्रमणे, पाश्चिमात्य संस्कृती यामुळे शिक्षणपद्धतीत बदल झाले. ब्रिटीश राजवटीत भारतीय शिक्षण व्यवस्थेत लक्षणीय बदल झाले.

 ISSN No. 2394-5990

ईस्ट इंडिया कंपनी कायदा (चार्टर अधिनियम) १८१३ नुसार शिक्षण ही सरकारची जबाबदारी मानण्यात आली. भारतातील लोक धर्माच्या पलीकडे जाऊन तत्त्वज्ञान, संशोधन व विकासाच्या दृष्टीने शिक्षण घेऊ लागले. समाजसुधारकांनी पुस्तकी शिक्षणापेक्षा माणसाला माणूस म्हणून जगायला शिकविणारे व माणसात माणुसकी निर्माण करणारे शिक्षण मिळविण्यासाठी अतोनात प्रयत्न केले. पहिले शैक्षणिक धोरण १९६८ रोजी व दुसरे १९८६ रोजी व नंतर तब्बल ३४ वर्षांनी तिसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० राबविले जात आहे. रवींद्रनाथ टागोर यांच्या म्हणण्यानुसार, जीवनाचा शिक्षणाशी जो मेळ असायला पाहिजे तो मुळीच नव्हता. त्यामुळे शिक्षण रसशून्य व आनंदशून्य बनले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर एके ठिकाणी म्हणतात, 'सर्व प्रकारच्या विषमता दूर करण्यासाठी आणि सामाजिक लोकशाही प्राप्त करून घेण्यासाठी शिक्षण हा एक राजमार्ग आहे.'

भारतीय राज्यघटनेतील राज्य धोरण मार्गदर्शक तत्त्वे, चौथ्या भागात कलम ४५ मध्ये वयाच्या १४ वर्षा पर्यंत राज्य मोफत व सक्तीचे शिक्षण देईल असे नमूद केले. सन १९७६ मध्ये ४२ व्या घटनादुरुस्तीत कायद्याने शिक्षणास राज्य यादीतून समवर्ती यादीमध्ये समाविष्ट केले. सन २००२ मधील ८६ व्या घटनादुरुस्तीने मूलभूत अधिकारांच्या कलम २१-ए अंतर्गत शिक्षणाच्या अंमलबजावणीचा मुलभूत हक्कांमध्ये समावेश करण्यात आला. सहा ते चौदा वयोगटातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण देण्यासाठी शिक्षण हक्क अधिनियम २००९ पासून लागू करण्यात आला आहे. या कायद्यांतर्गत समाजातील वंचित घटकांसाठी २५% आरक्षण खाजगी शाळांमध्ये देण्यात आले आहे.

जागतिक पातळीवर शिक्षण यंत्रणेच्या विकासाचा अभ्यास करण्यासाठी ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक को-ऑपरेशन (OECD) कडून दरवर्षी आंतरराष्ट्रीय विद्यार्थी मूल्यमापन कार्यक्रम (PISA) चाचणी घेण्यात येते. यात विविध देशातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाचा अभ्यास केला जातो व त्यांचे मुल्यांकन केले जाते. आज विद्यार्थ्यांना शाळेमध्ये मिळणारे शिक्षण हे व्यवहारिक जीवनात त्यांना उपयोगी होत आहे का या दृष्टीने त्याचे कौशल्य व क्षमता पहिल्या जातात. यामुळे विद्यांर्थ्यांना वास्तविक जीवनातील आव्हाने आणि भविष्यातील यशासाठी किती चांगली शिक्षण व्यवस्था तयार होत आहे हे पिसा चाचणीतून अभ्यासले जाते. भारताने झखड- २००९ मध्ये शेवटचा भाग घेतला होता तेव्हा भारत ७४ देशांमध्ये ७३ व्या क्रमांकावर होता. यातून भारतीय शिक्षण व्यवस्थेचे जागतिक पातळीवरील स्थान स्पष्ट होते. असे असतानाही भारताच्या संदर्भात अनेक ठिकाणी सकारात्मक चित्र देखील आपल्याला दिसते. भारत संशोधन, अंतराळ आणि तंत्रज्ञान यामध्ये प्रगती करत आहे. लंडनमधील क्काक्करेली सायमंड्सने (QS) या मानांकन संस्थेने १० एप्रिल २०२४ रोजी जागतिक विद्यापीठ क्रमवारी प्रकाशित केली. त्यात गछण विद्यापीठाने जागतिक स्तरावर २० वे स्थान मिळवले आहे. संशोधनात भारताचा ४ था क्रमांक आहे. खखढ मुंबई हे टड आशिया विद्यापीठ क्रमवारी २०२४ मध्ये ४० व्या क्रमांकावर आहे.

भारताने २०१५ मध्ये स्वीकारलेली शाश्वत विकासाची ध्येये महत्वाची आहेत. यामधील चौथे ध्येय हे गुणवत्तापूर्ण शिक्षण हे असून २०३० पर्यंत शिक्षणाचा दर्जा सुधारायचा आहे.

**फिनलंड शैक्षणिक धोरणाची भूमिका व शैक्षणिक सामाजीकरण :**

विषमता दूर करणे हे फिनलंडच्या शैक्षणिक धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. येथील लोक वर्ग आणि वर्णाचा भेद न करता ते एकत्र राहतात व सामाजिक तुलना करत नाही. प्रत्येक व्यक्तीसाठी कठीण काळात विसंबून राहण्यासाठी कोणीतरी असते. मुलांना स्वत:साठी विचार करण्याचे आणि वागण्याचे स्वातंत्र्य दिले जाते. बालकांचा परिपूर्ण व्यक्तिमत्व विकास होण्यासाठी आईचे सानिध्य जसे महत्वाचे असते तसेच वडिलांचे देखील महत्वाचे असते. बालसंगोपन ही दोघांची जबाबदारी असते म्हणून पुरुषांनाही ५६ दिवसांची पितृत्व रजा दिली जाते. आईला १६० दिवसांची मोफत प्रसूती रजा ती जवळपास एक वर्षाच्या पगारी रजे इतकी वाढवता येते. उच्च लिंग समानता असल्याने वैवाहिक संबध समतावादी आहेत. वाचन संस्कृती वाढविण्यासाठी, नवजात बालकांच्या पालकांना ङ्गमातृत्व पॅकेजफ्चा भाग म्हणून तीन पुस्तके दिली जातात. प्रत्येक पालकासाठी एक आणि लहान मुलांसाठी एक पुस्तक दिले जाते. फिनिश बालविकास तज्ञ ईवा हुजाला यांच्या मते, प्रारंभिक शिक्षण हा आजीवन शिक्षणाचा पहिला आणि सर्वात महत्वाचा टप्पा आहे. फिनलंडमध्ये पूर्ण दिवस बालसंगोपन केंद्रे आणि नगरपालिका क्रीडांगणे या दोन्हीं कार्यरत आहेत. प्ले ग्रुप मध्ये मुलांना मुलांसोबत राहण्यास, बोलण्यास व खेळण्यास मिळते, तसेच तेथे वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम घेतले जातात. प्रौढ पर्यवेक्षक जेथे पालक मुलांसोबत राहू शकतात. ज्या मातांना असे करायचे आहे त्यांना घरी राहण्यासाठी आणि पहिल्या तीन वर्षासाठी 'होम डेकेअर' करण्यासाठी नगरपालिका पैसे देते.

शिक्षणाच्या बाबतीत विचार केला तर फिनलंड पूर्वप्राथमिक ते विद्यापीठ शिक्षणापर्यंत मोफत शिक्षण देते. मुलांना पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रत्यक्ष जगण्यासाठी आवश्यक आणि व्यावहारिक गोष्टी शिकविल्या जातात. फिनलंडची सामाजिक कल्याण यंत्रणा ही नागरिकांना मोफत शिक्षण, आरोग्यसेवा आणि इतर उपयुक्त सेवा देते. यामुळे तेथील पालकांवरील मानसिक आणि आर्थिक भार कमी होतो. मास्लोच्या गरजांचा सिद्धांत पाहिला, तर मानवाच्या गरजा पूर्ण झाल्यानंतर माणूस हा स्वत:च्या वास्तविकतेकडे येतो. सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमीतील फरक असूनही फिनलंडमधील प्रत्येक मुलाला समान उच्च गुणवत्तेच्या शिक्षणाचा हक्क आहे. अभ्यासातील कच्च्या मुलांना कोणी नावे ठेवत नाही. अशा मुलांवर शिक्षक आणि शाळा विशेष लक्ष देतात. फिनलंड परीक्षा पद्धतीत वर्षभर जे शिकवले त्याचा वर्षाच्या शेवटी सगळी तपासणी ही त्यांची पद्धत नाही. प्रत्येक दिवशी कोणत्या ना कोणत्या पद्धतीतून मुलाचं परीक्षण सुरु असते. सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यांकन प्रभावीपणे केले जाते. स्वतंत्र लेखी परीक्षा नववीपर्यंत घेतली जात नाही. त्याऐवजी ठराविक कौशल्यांचा विकास मापदंड केला जातो. इथे शाळेत विद्यार्थ्याला सर्वात हुशार विध्यार्थी होण्यास प्रवृत्त केले जात नाही. विद्यार्थ्यांच्या गुणांप्रमाणे स्पर्धा नसते,तर शिकणारा समुदाय कसा तयार करायचा यावर सरकार लक्ष देते. येथील शिक्षण व्यवस्था प्रत्येक मुलाला सुशिक्षित बनविते तसेच चांगला माणूस कसा बनू शकेल हे शिकविते.

आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतल्या जाणाऱ्या पिसा चाचणीत फिनलंड हा २००२, २००३, २००६ या वर्षी प्रथम क्रमांकावर होता. जरी अलीकडील काळात फिनलंड प्रथम क्रमवारीत नसला तरी पिसा चाचणीत फिनलंडचे विद्यार्थी आपली कामगिरी चांगली बजावत आहेत. इतर क्षेत्रापेक्षा येथील सरकार शिक्षणाकडे अधिक लक्ष देते. त्यामुळे इतर क्षेत्र आपोआप विकसित होतात. फिनलंडला जगातील सर्वात आनंदी देश म्हटले जाते ते त्याच्या वैज्ञानिक प्रगतीमुळे किंवा संस्थात्मक उत्पादकतेमुळे नव्हे तर त्यांच्या मूल्यांमुळे.

**आनंदी देश बनण्यासाठी भारतापुढील आव्हाने :**

आजची मुले देशाचे भवितव्य घडवणार आहेत. पण भविष्याचा विचार करण्या अगोदर सद्यस्थितीत मुलांच्या विकासाकडे लक्ष देणे महत्वाचे आहे. मुलांचे सामाजिकरण व त्यांच्या विकासासाठी देशाचे प्रयत्न, यावरून तो भविष्यात कशाप्रकारचा नागरिक बनेल हे अवलंबून असेल. समानताधारीत शिक्षणव्यवस्था आपल्याला लहानपणापासून आनंदी व मुलकेंद्रित शिक्षण देऊ शकते व चांगला समाज घडवू शकते.

**भारतापुढील आव्हाने :**

- मुलांच्या सामाजीकरणात कुटुंब व शासन हे विषमता निर्माण करत आहेत.
- २००९ च्या शिक्षण हक्क कायद्यानुसार सर्वांना शिक्षण उपलब्ध व्हावे असे आहे पण आता सरकारी शाळा बंद होत आहेत.
- मोठ्या प्रमाणात शिक्षणाचे खाजगीकरण.
- शैक्षणिक संस्थामध्ये भ्रष्टाचार व स्पर्धामध्ये वाढ.
- आजही विद्यार्थी भेदभाव व अपमान व तत्सम इतर कारणांमुळे आत्महत्या करतात.
- शासनाच्या शाळांमधून मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण नाही तसेच शैक्षणिक सुविधांचा व सोयीसुविधांचा अभाव.
- बऱ्याच मुलांच्या मनात प्रश्न आहे की शाळा शिकून आम्हाला काय मिळणार?
- शिक्षणाअभावी लहान मुले गुन्हेगारीकडे वळत आहेत.
- मुलांचा शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी पालकांना रोजगारासाठी घराबाहेर जावे लागते. पूर्वी मुलांची काळजी घ्यायला आजी -आजोबा किंवा आई घरी असायची. पण आता महागाईच्या काळात विभक्त कुटुंब होत आहेत. मुलांच्या सुरक्षिततेचा व संगोपनाचा प्रश्न निर्माण होत आहे.
- २०२२-२०२३ च्या आर्थिक सर्वेनुसार भारताचा २.९% GDP शिक्षणावर आहे. लोकसंख्या १४० कोटी असताना भारताचा प्रत्यक्ष शिक्षणावर खर्च फार कमी आहे.
- भारतात कुपोषण,उपासमार,गरिबी,बेरोजगारी याचे प्रमाण जास्त आहे. जागतिक भूक निर्देशांकात १२५ देशांच्या यादीत भारत १११ व्या स्थानी आहे.
- कायदे व धोरणांची अंमलबजावणीत अस्पष्टता.
- राजकारणातून धार्मिक व जातीय तणाव यामुळे विषमतेत वाढ.
- सामाजिक मुल्ये व सुरक्षितता यात कमतरता.
- वाढत्या लोकसंख्येमुळे उद्भवणाऱ्या समस्यामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ.

**आनंदी देश बनण्यासाठी भारताने काय करायला हवे :**

१. बालसंगोपन ते पूर्वप्राथमिक शिक्षण यावर पालक व शासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. सामाजिकरणामध्ये मुलामुलीं मध्ये कुटुंबात भेदभाव नसावा.
२. विद्यार्थ्यांच्या उपजत गुणांना वाव दिला पाहिजे.

ISSN No. 2394-5990

३. पालकांनी शिस्त लावताना मुलांना समजून घ्यायला हवे.
४. समानतेच्या आधारावर शिक्षण असायला हवे. नवीन शैक्षणिक धोरणाची योग्यप्रकारे अंमलबजावणी व्हावी.
५. मुलांना स्पर्धा नसलेले, ताणरहित आणि मुलकेंद्रित शिक्षण असावे. परीक्षांचे स्वरूप हे मुलांना समजेल असे असावे,गुणांक पद्धतीत बदल असावा.
६. गुणवत्तापूर्ण शिक्षण व शैक्षणिक सुविधांमध्ये वाढ करणे अपेक्षित आहे.
७. शैक्षणिक शुल्का मध्ये बदल करावा. सर्वसामान्यांना उपयोगी पडेल असे शुल्क असावे.
८. शालेय समित्यांनी प्रभावीपणे काम करावे. समित्यामध्ये राजकारणाचा हस्तक्षेप नसावा.
९. शिक्षण धोरण व शैक्षणिक कायदे व्यवस्थितपणे राबविले जावेत.
१०. भारताच्या शिक्षण व्यवस्थेने स्वत:ला विकसित करायला, व स्वत:चे कौशल्य विकसित करता यायला हवे यावर कमी लक्ष दिले आहे त्यावर काम करणे अपेक्षित आहे.
११. आरोग्यसेवा तसेच इतर कल्याणकारी सेवा जनतेसाठी योग्यप्रकारे राबविल्या जाव्यात. चांगले कल्याणकारी राज्य प्रत्येक नागरिकास समाधानी व आनंदी आयुष्य जगायला मदत करू शकते.
१२. शाश्वत विकासाचे ध्येय यामध्ये चौथे ध्येय हे गुणवत्ता पूर्ण शिक्षण आहे. २०३० पर्यंत भारत सरकारला ते साध्य करायचे आहे.त्यासाठी आवश्यक ते प्रयत्न केले जावेत.
१३. माणूस हा सामाजिक प्राणी आहे. समाजासोबत त्याचे हितसंबंध जोडले असतात. परंतु आजूबाजूची परिस्थिती व वातावरण त्याला एकट राहण्यास भाग पाडते. त्यामुळे समानता, कायदे ,सामाजिक मुल्ये व सुरक्षितता याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष:**

समानता असणारे शैक्षणिक धोरण मानवामध्ये सकारात्मकता व चांगला समाज घडवते. आपल्याला समानता असणारे, चांगला माणूस बनविणारे,चारित्र्य घडविणारे व चांगले विचार आत्मसात करणारे शिक्षण हवे आहे. जगातील सर्वात जास्त युवकांची संख्या भारतात आहे. २०४७ पर्यंत आपल्या स्वप्नातील भारत सक्षम व विकसित करण्यासाठी आणि तरुणाच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण हा आधारस्तंभ आहे. फिनलंड मध्ये कल्याणकारी राज्य संकल्पना आहे. तेथील नागरिकांना मोफत शिक्षण व आरोग्याच्या सेवा मिळतात. तसेच प्रसूती रजा,पितृत्व रजा मिळते त्यामुळे पालकांना मुलांचे संगोपन चांगल्या आनंदी वातावरणात करता येते. फिनलंडमधील समताधारीत शिक्षण मुळात विद्यार्थ्यांना आनंदी जीवन जगण्यास मदत करणारे आहे.

**संदर्भसूची :**

१. O’Brien, Catherine. Education for sustainable happiness and well-being. Routledge, 2016.
२. Stryzhak, O. O. The relationship between education, income, economic freedom and happiness. (2020).
३. Araki, Satoshi. Does education make people happy? Spotlighting the overlooked societal condition. Journal of Happiness Studies 23.2 (2022): 587-629.
४. Noddings, Nel. Happiness and education. Cambridge University Press, 2003.
५. Blessinger, Patrick. What role should education play in creating happiness. Conference: 2012 Felicitology Conference. A Happy Teacher: Felicitology in Education.
६. Diener, Ed, and Richard E. Lucas. Explaining differences in societal levels of happiness: Relative standards, need fulfillment, culture, and evaluation theory. Journal of happiness studies 1 (2000): 41-78.
७. Federick, Ashok. Finland education system. International Journal of Science and Society 2.2 (2020): 21-32.
८. Tenhunen, Marja-Liisa. Why Finland Is the Happiest Country in the World?. Cogito-Multidisciplinary research Journal 3 (2020): 18-28.
९. https://www.jansatta.com/blog/suicides-in-india-quite-worrying-depression-increasing-among-people-kota-rajasthan-coaching-center-excessive-mental-pressure-competitive-examinations-suicide-by-students/2837611/

१०. भगत, रा. तु , शिक्षणातील थोर विचारवंत,२००१, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर
११. कुलकर्णी शिरीन आणि हेरंब , शिक्षणगंगा फिनलंडमधून आपल्या दारी, २०२२,सी.सी.ई फिनलंड ओ वाय फिनलंड
१२. Esakal.com/education-jobs Shirin Kulkarni 13/12/2023 4.19 pm
१३. Kktutorial.com/2022/03/Finland-and-our education html. 5.01 pm
१४. Education.gov.in/sites 13/12/2023 11.06am
१५. www. Loksatta.com/career-vrutant/new-flow-education system-in Finland 22/02/2023, 2.45 pm
१६. http://worldhapiness.report/ed/2024
१७. http://www.education.gov.in


■■■